0 4 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठे- शिक्षण विभागाने एकत्रित काम करावे

## पालकमंत्री : शिवाजी विद्यापीठात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : 'आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचा अवलंब करून शालेय शैक्षणिक संकल्पनांचे सुलभीकरण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने विशेष ॲप विकसित करून शालेय शिक्षण क्षेत्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे येथून पुढच्या काळात शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी विद्यापीठे आणि शालेय शिक्षण विभाग यांनी एकत्रित काम केल्यास अधिकाधिक शैक्षणिक विकास साधणे शक्य होईल', असे प्रतिपादन पालकमंत्री दीपक केसरकर यांनी सोमवारी येथे केले.

विद्यापीठाने विकसित केलेल्या 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. व्यवस्थापन परिषद सभागृहातील या कार्यक्रमास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे उद्‌घाटन पालकमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. सुधीर देसाई आदी उपस्थित होते.**

पालकमंत्री केसरकर म्हणाले, 'आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली महाराष्ट्रातील विदर्भासह सर्व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा मनोदय आहे. शैक्षणिक गुणवत्ता ही उत्तम मार्गदर्शनातूनच येईल. त्यासाठी भाषा, विज्ञान व गणित या विषयांमध्ये त्याला रुची निर्माण व्हावी, या दिशेने काम करण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठाने निर्माण केलेल्या या आधुनिक प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या विज्ञानविषयक संकल्पना अधिक सुस्पष्ट होऊन त्यांना त्यात रुची निर्माण होईल. त्यातून केंद्रीय स्पर्धा परीक्षांमध्येही ते यशस्वी होतील.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून विकसित करण्यात आलेल्या या प्रणालीमध्ये सध्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या तीन विषयांच्या १०४ संकल्पनांचे आधुनिक आभासी वास्तविकता तंत्रज्ञानाच्या आधारे सुलभीकरण करण्यात आले आहे. विज्ञानातील अवघड व क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांना समजण्यास त्यामुळे सोपे होणार आहे. ही प्रणाली प्रशासनाच्या सहकार्याने जिल्ह्यातील सर्व शासकीय शाळांमधील आठवी, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.' या कार्यक्रमात डॉ. सुधीर देसाई, वैशाली भोसले यांनी या आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे सादरीकरण केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### प्रणालीची सुरूवात होत असल्याचा मनस्वी आनंद

शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीसाठी तत्कालीन पालकमंत्री आमदार सतेज पाटील यांनी ७५.४० लाखांचा निधी जिल्हा नियोजन मंडळाच्या नाविण्यपूर्ण योजनेतून उपलब्ध करून दिला. दरम्यान, या प्रणालीमुळे शासकीय शाळेत शिकणाऱ्या इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना उपयोग होणार आहे. ही प्रणाली प्रत्यक्षात साकारत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे. शालेय विद्यार्थ्यांसह इतर क्षेत्रांमध्ये देखील याचा वापर होईल अशी खात्री वाटत असल्याची प्रतिक्रिया आमदार पाटील यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 MAY 2023
तरुण भारत

# विज्ञानाच्या पुस्तकातील आकृत्या दिसणार थ्रीडीमध्ये


**बदलत्या शिक्षण पध्दतीनुसार तांत्रिक बदल स्विकारताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अडचणी येवू नयेत. 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'(Augmented and virtual reality) विकसित केली आहे. ही प्रणाली तयार करण्यासाठी माया, ब्लेंडर, युनिटी, टीडीएस मॅक्स या सॉफ्टवेअरचा वापर करून डॉ. सुधीर देसाई आणि डॉ. वैशाली भोसले या दोन्ही संशोधक प्राध्यापकांनी तब्बल दीड वर्षे संशोधन केले आहे. संशोधनाअंती इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना विज्ञानातील क्लिष्ट आकृती स्पष्टपणे थ्रीडीमध्ये पाहता यावी यासाठी 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली' विकसित केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना हे तंत्रज्ञान मोफत वापरता येणार असल्याने या तंत्रज्ञानाला शैक्षणिकदृष्ट्या अतिशय महत्व आले आहे.**

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

डॉ. देसाई आणि डॉ. भोसले यांनी तयार केलेले 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'चे ॲप्लीकेशन स्मार्ट फोनमध्ये मोफत डाऊनलोड करता येणार आहे. विज्ञानाच्या पुस्तकातील आकृत्यांवर स्मार्ट फोनमध्ये डाऊनलोड केलेले ॲप्लीकेशन पकडले की थ्रीडीमध्ये आकृती स्पष्ट दिसतेय. आकृतीतील सर्व फंक्शन आणि माहितीदेखील थ्रीडीमध्ये दिसते. त्यामुळे आठवी ते दहावीच्या क्रमिक पुस्तकातील सर्वच आकृत्यांचा अभ्यास करून लक्षात राहण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत होणार आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातून 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली' या प्रणालीचे स्वागत होऊ लागले आहे.

- **विद्यापीठातील डॉ. सुधीर देसाई आणि डॉ. वैशाली भोसले यांचे संशोधन**
- **'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली''**
- **आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या आकृत्या पाहण्यासाठी उपयुक्त**

ही प्रणाली तयार करण्यापूर्वी पहिल्यांदा पायलट बेसेसवर बायोलॉजी विषयावर ॲप्लीकेशन तयार केले होते. त्यानंतर सायन्स विषयांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी ही प्रणाली तयार केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुसुत्र पध्दतीने शिक्षण घेता यावे. यासाठी माया, ब्लेंडर, युनिटी, टीडीएस मॅक्स ही सॉफ्टवेअर वापरून 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली' तयार केले. या प्रणालीचा नुकताच उद्घाटन सोहळा झाला असून जून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सरकारी शाळांमध्ये वापर केला जाणार आहे. या विद्यार्थी उपयोगी संशोधनासाठी तत्कालिन पालकमंत्री सतेज पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीमधून ७५ लाख ४० हजार रूपयांची देणगी देवून संशोधकांना प्रोत्साहन दिले. या आर्थिक मदतीतूनच तयार केलेल्या 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली' जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना उपयोगी पडणार आहे. भविष्यात हे तंत्रज्ञान राज्यभरातील विद्यार्थ्यांना देण्याचा संशोधकांचा मानस आहे.



### क्रमिक पुस्तकातील १०४ आकृत्यांचा समावेश

'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली' मध्ये आठवी ते दहावीच्या क्रमिक विज्ञान पुस्तकातील १०४ आकृत्यांचा समावेश केला आहे. या आकृत्या थ्रीडीमध्ये दिसणार असून अवघड संकल्पना स्पष्ट होणार आहेत.

### विद्यार्थ्यांसाठी उपयोगी संशोधन केल्याचा आनंद

शिक्षणातील बदल पाहता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान हाताळता यावे, यासाठी 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली' विकसित केली आहे. तांत्रिक गोष्टींसाठी डॉ. अजित कोळेकर, डॉ. सुनील रायकर, रमेश रणदिवे आणि ऋषिकेश जोशी यांनी मदत केली. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना या प्रणालीचे ॲप मोफत दिले जाईल. भविष्यात आवश्यक तांत्रिक बदल करून राज्यभरातील सर्व सरकारी शाळांना ही प्रणाली देण्याचा मानस आहे.

**डॉ. सुधीर देसाई, डॉ. वैशाली भोसले**
**(सहाय्यक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट)**

04 MAY 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. आर. के. कामत

## राज्यपालांकडून निवड; शुक्रवारी पदभार स्वीकारणार

कोल्हापूर, ता. ३ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. आर. के. कामत यांची निवड राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केली आहे. या निवडीचे पत्र कुलपती कार्यालयाकडून डॉ. कामत यांना मिळाले. ते गेल्या नऊ महिन्यांपासून डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत.

सोलापूर विद्यापीठाच्या सध्याच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांचा कार्यकाल शुक्रवारी (ता. ५) पूर्ण होणार आहे. नवीन कुलगुरू निवडीची प्रक्रिया होईपर्यंत या पदाचा कार्यभार सांभाळण्यासाठी कुलपती बैस यांनी डॉ. कामत यांची निवड केली आहे. ते शुक्रवारी सोलापूर विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत.



आर. के. कामत

मूळचे कोल्हापूरचे असणारे कुलगुरू डॉ. कामत यांनी यापूर्वी शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून काम केले आहे. विद्यापीठात केंद्र सरकारच्या निधीतून सायबर सुरक्षा केंद्र स्थापन करण्यात त्यांनी योगदान दिले. आयक्यूएसीचे संचालक म्हणून काम करताना विद्यापीठाला नॅकचे ए-प्लस प्लस मानांकन मिळवण्यात त्यांची प्रमुख भूमिका होती. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने त्यांना यंग सायंटिस्ट पुरस्काराने सन्मानित केले आहे. ते ऑस्ट्रेलियातील विकटोरियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजीचे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील मानद प्राध्यापक आहेत.

> 'या निवडीबद्दल कुलपतींचे मी आभार मानतो. नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठात राबविण्याला माझे प्राधान्य राहणार आहे.
>
> **-डॉ. आर. के. कामत**

पुढारी

# सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. आर. के. कामत



कोल्हापूर : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी राज्यपाल रमेश बैस यांनी निवड केली आहे. या याबाबतचे पत्र कुलपती कार्यालयाकडून देण्यात आले आहे. डॉक्टर कामत मूळचे कोल्हापूरचे आहेत

पुण्यनगरी

# विद्यापीठात 'शिव महोत्सव' उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे 'शिव महोत्सव' विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामध्ये झाला. उद्‌घाटन संयोगिताराजे छत्रपती यांच्या हस्ते झाले. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर प्रमुख उपस्थित होते. निमाताई ढमाले यांना 'जिजाऊ शिव प्रेरणा पुरस्कार' आणि सारिका पाटणकर यांना शिव ताराराणी आणि डॉ. विवेक धुपदाळे यांना शिव गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.